# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/03/2023 (शुक्रवार) दुपार


---

### पोलीस शिपाई लेखी परीक्षा

**पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामीण या घटकात** पोलीस शिपाई भरती—२०२१ च्या शारीरिक चाचणीमध्ये भरतीमध्ये एकुण १४९८ उमेदवार हे विहीत गुणांनी उत्तीर्ण झालेले असुन त्या उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा **दिनांक ०२/०४/२०२३ रोजी वेळ सकाळी ६.०० वाजता तुळशीराम गायकवाड पाटील, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, मोहगाव वर्धा रोड नागपूर जिल्हा नागपूर** येथे घेण्यात येणार आहे. उमेदवारांनी लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन पद्धतीने डाऊनलोड करण्यास उपलब्ध आहे. याबाबत पात्र उमेदवारांची यादी नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या **nagpurgraminpolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात आली आहे.

### पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे हस्ते
### सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना भावपुर्ण निरोप

दिनांक ३१/०३/२०२३ रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण), येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका **"निरोप समारंभाच्या"** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या १) उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग श्री मुख्तार बागवान, २) उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग श्री. नागेश विश्वनाथ जाधव ३) पोलीस उपनिरीक्षक श्री. अश्पाक अली बाकर अली चिश्तीया, श्वानपथक नागपूर ग्रामीण ४) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक जयप्रकाश कुंवर जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण ५) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक दिलीप नामदेवराव इंगळे, पोलीस स्टेशन कोंढाळी ६) सहायक फौजदार श्री. रमेशकुमार माधोराव भोयर स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांना नागपूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही पोलिस अधिक्षक यांनी यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल त्यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची प्रशंसा केली. या कार्यक्रमाला नागपूर ग्रामीण येथील अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले, पोलीस उप अधिक्षक (गृह) श्री. संजय पुरंदरे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी हे उपस्थित होते.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर